विजय कृष्णा कुंभार,
ए - ६, अनुपमा स.गृ.संस्था ,
बॉडिगेट,औंध,पुणे -४११००७
फोन - ९९२३२९९१९९
दि - ३/१/२०११

प्रति,
**मा.श्री.विजय कुवळेकर**
राज्य माहिती आयुक्त,
पुणे.

**विषय - माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अंतर्गत तक्रार ...**

**संदर्भ -१) माहिती अधिकारातील कार्यकर्ते कै.सतिश शेट्टी यांनी लोणावळा पोलिस ठाण्यात केलेल्या तक्रारी .**
**२) कै.सतिश शेट्टी यांनी पुणे जिल्यातील ताजे ,पिंपळोली गावातील जमिनींच्या व्यवहारांची मागीतलेली माहिती .**
**३)पुणे जिल्यातील तळेगांव येथील कार्यकर्ते श्री.अरूण माने यांचा दि.३०/११/२०१० चा माहिती अधिकारातील अर्ज (सोबत प्रत जोडली आहे)**

महोदय,

माहिती अधिकारातील कार्यकर्ते सतीश शेट्टी यांची १३ जानेवारी २०१० रोजी हत्या झाली. हत्येपूर्वी त्यांनी पुणे जिल्यातील मौजे ताजे व पिंपळोली गावातील जमिन खरेदी-विक्री, व वनजमिनींच्या गैरप्रकारांची माहिती ,माहिती अधिकारातून घेतली होती व त्या अनुषंगाने लोणावळा पोलिस ठाण्यात तक्रारही दाखल केली होती.त्या तक्रारीनंतर सतिश शेट्टी यांची हत्या झाली.

दिनांक ३० /११/ २०१० रोजी तळेगावातील श्री . अरूण माने यांनी लोणावळा पोलिस ठाण्यात माहिती अधिकारांतर्गत अर्ज करून सतिश शेटी यांनी दाखल केलेल्या तक्रारी संदर्भात वस्तूस्थितीची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.त्यानंतर श्री. माने यांना धमकी देण्यात आली व नंतर त्यांच्यावर प्राण घात हला केला .

वरील दोन्ही बाबी या माहिती अधिकाराच्या वापरकर्त्यांचे मनोबल खच्ची करणाऱ्या, घातक आणि माहिती अधिकारातील तरतूदींना उघड आव्हान देणाऱ्या आहेत.

खरेतर सतीश शेट्टी यांनी माहिती अधिकारांतर्गत मागीतलेली माहिती व केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही व कारवाई या बाबी या कायद्यातील कलम चार अंतर्गत येत असल्याने संबधीत सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी ती माहिती स्वत:होउन प्रसिद्ध करून लोकांना कळविणे आवश्यक होते .तशी ती प्रसिद्ध करणे दूरच परंतू जे माहिती मागताहेत त्यांच्यावरच हल्ले होताहेत ही बाब अत्यंत गंभीर आहे.

माझ्या माहिती प्रमाणे श्री. सतिश शेट्टी यांना माहिती अधिकारांतर्गत मागीतलेली माहिती व केलेल्या तक्रारी या प्रामुख्याने खालील सार्वजनिक प्राधिकरणांशी संबधीत आहेत

१) जिल्हाधिकारी , पुणे

लिपिक
... आयुक्त कार्यालय

२) आयुक्त, जमाबंदी व संचालक भूमी अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे -१
३) नोंदणी महानिरिक्षक , नवीन प्रशासकीय इमारत, पुणे १
४) पोलिस अधिक्षक, पुणे ग्रामीण पोलीस , पुणे
५) मुख्य वनसंरक्षक, पुणे विभाग, पुणे.

वरील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी सतिश शेट्टी यांनी मागीतलेली सर्व माहिती व त्यांनी केलेल्या तक्रारींसंदर्भात काय कार्यवाही व कारवाई केली याची माहिती व सर्व संबधित कागदपत्रे कलम चार अंतर्गत प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्यांनी तशी ती केलेली नाही.त्यामुळे त्यांना ती माहिती तातडीने प्रसिद्ध करण्याचे आदेश द्यावेत हि विनंती.

सतिश शेट्टी यांनी मागीतलेली माहिती व त्यांच्या तक्रारींचा पाठपुरावा केल्यास कार्यकर्त्यांवर हल्ले होतात हे आता सिद्ध झाले आहे.त्यामुळे सदर तक्रार अर्जाचा तातडीने विचार करून आदेश द्यावेत हि विनंती.

कळावे ,

आपला

विजय कृष्णा कुंभार

KUMBAR